महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ३६ वा दिनांक : २५/१०/२०२४ वार : शुक्रवार

# शरद पवारांच्या पक्षाकडून पहिली उमेदवार यादी जाहीर



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, आमदार रोहित पवार, अनिल देशमुख, राजेश टोपे, बाळासाहेब पाटील, जितेंद्र आव्हाड या नेत्यांना पक्षानं पुन्हा एकदा संधी दिली आहे. तर उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या बारामती मतदारसंघातून युगेंद्र पवारांना तिकीट देण्यात आलेलं आहे.

त्यामुळे बारामतीत यंदा काका विरुद्ध पुतण्या असा थेट सामना पाहायला मिळेल. लोकसभा निवडणुकीत बारामतीमध्ये अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा पराभव झालेला आहे. त्यानंतर आता शरद पवारांनी पुतण्याविरोधात नातू युगेंद्र पवारांना संधी दिली आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी शरद पवारांचे उमेदवार कोण कोण? इस्लामपूर- जयंत पाटील, काटोल- अनिल देशमुख, घनसावंगी- राजेश टोपे, कराड उत्तर- बाळासाहेब पाटील, कळबा मुंब्रा- जितेंद्र आव्हाड, कोरेगाव- शशिकांत शिंदे, वसमत- जयप्रकाश दांडेगावकर, जळगाव ग्रामीण- गुलाबराव देवकर, इंदापूर- हर्षवर्धन पाटील, राहुरी- प्राजक्त तनपुरे, शिरुर- अशोकराव पवार, शिराळा- मानसिंगराव नाईक, विक्रमगड- सुनील भुसारा, कर्जत जामखेड- रोहित पवार, अहमदपूर- विनायकराव पाटील, सिंदखेडराजा- राजेंद्र शिंगणे, उदगीर- सुधाकर भालेराव, भोकरदन- चंद्रकांत दानवे, तुमसर- चरण वाघमारे, किनवट- प्रदीप नाईक, जिंतूर- विजय भांबळे, केज- पृथ्वीराज साठे, बेलापूर- संदीप नाईक, वडगाव शेरी- बापूसाहेब पठारे, जामनेर- दिलीप खोडपे, मुक्ताईनगर- रोहिणी खडसे, मुर्तिजापूर- सम्राट डोंगरदिवे, तिरोडा- रविकांत बोपछे, अहेरी- भाग्यश्री अत्राम, बदनापूर- बबलू चौधरी, मुरबाड- सुभाष पवार, घाटकोपर पूर्व- राखी जाधव, आंबेगाव- देवदत्त निकम, बारामती- युगेंद्र पवार, कोपरगाव- संदीप वर्पे, शेवगाव- प्रताप ढाकणे, पारनेर- राणी लंके, आष्टी- मेहबूब शेख, करमाळा-नारायण पाटील, सोलापूर शहर उत्तर - महेश कोठे, चिपळूण- प्रशांत यादव, कागल- समरजीत घाटगे, तासगाव कवठेमहाकाळ- रोहित आर आर पाटील, हडपसर- प्रशांत जगताप

## पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्रात महायुतीच्या प्रचारासाठी घेणार जाहीर सभा



**मुंबई :** महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली असून गुरुवारी अनेक दिग्गजांनी आपले उमेदवारी अर्ज भरले. चंद्रकांत पाटील, हर्षवर्धन पाटील, आदित्य ठाकरे, जितेंद्र आव्हाड यांनी शक्तीप्रदर्शन करत आपले नामांकन दाखल केले. २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी भरण्याची तारीख असून त्यानंतर प्रचाराला सुरुवात होणार आहे. महायुतीच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्रात येणार आहेत. पंतप्रधान मोदींच्या राज्यात ८ सभा होणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी ७ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर महाराष्ट्रात तळ ठोकून असणार आहेत. या ८ दिवसांत ते विविध मतदारसंघात जाहीर सभा घेतील. पंतप्रधान मोदी १४ नोव्हेंबरपासून परदेश दौऱ्यावर जाणार आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रचारासाठी फारसा वेळ नसणार. त्यामुळे या ८ दिवसांत मोदींच्या जास्तीत जास्त सभा घेण्यावर महायुती भर देईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी केवळ भाजपच नाही तर महायुतीच्या घटक पक्षातील उमेदावारांच्या प्रचारासाठी सुद्धा सभा घेतील.

## मतदाराच्या ओळखीसाठी १२ पुरावे ग्राह्य धरले जाणार

**हिंगोली :** विधानसभा निवडणुकीमध्ये मतदान ओळखपत्रा अभावी मतदार मतदानापासून वंचित राहू नये यासाठी मतदाराच्या ओळखीसाठी १२ पुरावे ग्राह्य धरले जाणार आहेत. त्यामुळे यापैकी एक पुरावा दाखवून मतदारांना मतदान करता येणार आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र देण्यात आले आहे. ते मतदार मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करतील. परंतु मतदारांकडे छायाचित्रासह मतदार ओळखपत्र नसल्यास असे मतदान मतदानापासून वंचित राहू नये यासाठी त्यांची ओळख पटविणारे १२ पुरावे ग्राह्य धरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानुसार या पुराव्यांमध्ये आधारकार्ड, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे जॉब कार्ड, बँक किंवा पोस्ट ऑफिसचे छायाचित्र असलेले पासबुक, कामगार मंत्रालयाच्या योजनेंतर्गत देण्यात आलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालविण्याचा परवाना, पॅन कार्ड, रजिस्टार जनरल ऑफ इंडिया यांच्याद्वारा नॅशनल पॉप्युलेशन रजिस्टर अंतर्गत निर्गमित स्मार्ट कार्ड, भारतीय पासपोर्ट, छायाचित्रासह पेन्शन दस्तऐवज, केंद्र, राज्य सरकार, सार्वजनिक उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपनी यांनी कर्मचाऱ्यांना जारी केलेले सेवा ओळखपत्र, खासदार, आमदारांना जारी करण्यात आलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाने जारी केलेले विशेष विकलांगता प्रमाणपत्र आदी बारा कागदपत्रांचा समावेश आहे.

मतदारांना छायाचित्रासह मतदार ओळखपत्र देण्यात आलेले आहेत, ते मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी छायाचित्रासह मतदार ओळखपत्र सादर करतील. मात्र सदर मतदार ओळखपत्र नसल्यास या १२ प्रकारच्या ओळखपत्रापैकी कोणत्याही एक ओळखपत्राचा उपयोग करून मतदानाचा हक्क बजावता येणार असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी अभिनव गोयल यांनी सांगितले

## काँग्रेस नेते राजेश मुंढे आज उमेदवारी अर्ज भरणार



**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेते राजेश मुंढे हे आज शुक्रवार २५ ऑक्टोबर रोजी संभाजीनगर पूर्व मतदार संघातून आपला उमेदवारी अर्ज भरणार आहेत.

सकाळी ११.०० वाजता जयभवानी नगर चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून पदयात्रेला सुरवात होईल. ही पदयात्रा पुंडलीकनगर मार्गे गजानन महाराज मंदीरापर्यंत येईल. तेथे गजानन महाराजांचे दर्शन करून घेऊन पुढे उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी सेंट फ्रान्सीस हायस्कुल येथे आपला उमेदवारी अर्ज सादर करतील अशी माहिती राजेश मुंढे यांच्या संपर्क कार्यालयातून देण्यात आली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २५ ऑक्टोबर २०२४


## सुरेश महाराज आढाव चिंचखेडकर यांच्या कीर्तनाला तृतीय क्रमांक



**कन्नड (अक्षय चव्हाण) :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ५६ व्या पुण्यतिथीनिमित्त अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम, मोझरी, जि. अमरावती यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय कीर्तन महोत्सवात कन्नड तालुक्यातील चिंचखेडा येथील कीर्तनकार सुरेश महाराज आढाव यांच्या कीर्तनाने तृतीय क्रमांक पटकावला.

देहू येथील जगद्गुरू तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष गुरुदेव यांच्या हस्ते तृतीय क्रमांकाच्या पारितोषक सुरेश महाराज आढाव यांना देण्यात आले. या राज्यस्तरीय कीर्तन स्पर्धेमध्ये वारकरी संप्रदायाची नवतरुण आध्यात्मिक धार्मिक उपासना करणाऱ्या व वारकरी संप्रदाय पाया असणाऱ्या सर्व जिल्ह्यांतून कीर्तनकारांची निवड करण्यात आली होती.

या कीर्तन महोत्सवाचे परीक्षक म्हणून जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे मुंबई येथील कैलास महाराज चव्हाण, पुणे येथील सचिन महाराज पवार यांनी काम पाहिले.

## अजित पवारांकडून नरहरी झिरवाळांना उमेदवारी

**नाशिक :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री अजित पवारांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. यात दिंडोरी विधानसभा मतदारसंघातून नरहरी झिरवाळ यांना उमेदवारी देण्यात आली आहे. नरहरी झिरवाळ यांना उमेदवारी जाहीर केल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या शिवसेना पक्षातील नेते व माजी आमदार धनराज महाले यांनी बंडखोरी करत उमेदवारी अर्ज देखील भरला आहे.

धनराज महाले हे दिंडोरी विधानसभा मतदारसंघातून शिवसेना शिंदे गटकडून इच्छुक उमेदवार होते, मात्र महायुतीमध्ये ही जागा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला सुटल्याने अजित पवारांनी नरहरी झिरवाळ यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे धनराज महाले यांनी बंडखोरी केली आहे. दरम्यान नरहरी झिरवाळ यांनी उमेदवारी अर्ज देखील भरला असून सलग तिसऱ्यांदा ते दिंडोरी मतदारसंघातून निवडणूक लढणार आहेत.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून नरहरी झिरवाळ यांचे पुत्र गोकुळ झिरवाळ हे शरद पवार गटाकडून निवडणुक लढवणार असल्याचे बोलले जात आहे. मात्र गोकुळ झिरवाळ माझेच काम करतील, असा खुलासा देखील त्यांनी केला आहे. गोकुळ झिरवाळ यांनी शरद पवारांची अनेकवेळा भेट घेतली होती तसेच जयंत पाटलांची देखील त्यांनी भेट घेतली होती, त्यामुळे गोकुळ झिरवाळ हे महाविकास आघाडीमध्ये शरद पवारांच्या गटाकडून निवडणूक लढणार, अशी चर्चा रंगली होती.

दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या ३८ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. मात्र या यादीत गोंदिया येथील अर्जुनी मोरगाव मतदारसंघातील विद्यमान आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांचे तिकीट कापल्याने त्यांनी बंडखोरी केल्याचे समोर आले आहे. आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी बंडखोरी करत महाराष्ट्रातील तिसरी आघाडी परिवर्तन महाशक्तीमधील प्रहार या पक्षात प्रवेश करत मैदानात उतरणार आहेत.

नागपूर येथील आभा पांडे यांनी देखील बंडखोरी केल्याचे दिसून येत आहे. नागपूर पूर्व विधानसभा मतदारसंघातून अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या नेत्या आभा पांडे यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल करत, कोणत्याही परिस्थितीत पूर्व नागपूरमधून माझा उमेदवारी अर्ज परत घेणार नाही, अशी भूमिका आभा पांडे यांनी घेतली आहे.

## अहेरीत बाप विरुद्ध लेक रंगणार लढत, धर्मरावबाबांच्या विरोधात भाग्यश्री आत्राम

**गडचिरोली :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवार गटाने पक्षाची ४५ उमेदवारांची पहिली यादी अधिकृतपणे जाहीर केली आहे. जाहीर केलेल्या यादीनुसार शरद पवार गटाने अजित पवार गटासाठी चांगलेच आव्हान उभे केले असल्याचे दिसत आहे.

बारामती विधानसभा मतदारसंघातून काका विरुद्ध पुतण्या अशी लढत रंगणार आहे, तर अहेरी विधानसभा मतदारसंघात बाप विरुद्ध लेक अशी लढत होणार आहे. त्यामुळे यंदाची निवडणूक चांगलीच रंगणार असल्याचे दिसत आहे.

बारामती विधानसभा मतदारसंघातून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विरोधात त्यांचा पुतण्या युगेंद्र पवार यांना शरद पवारांनी उमेदवारी दिली आहे. तसेच अहेरी विधानसभा मतदारसंघात शरद पवारांनी भागयश्री आत्राम यांना त्यांचे वडिल धर्मराव आत्राम यांच्या विरोधात उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे सर्वांचे लक्ष या निवडणुकीकडे असणार आहे.

गडचिरोली येथील अहेरी विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी कॉंग्रेस म्हणजे धर्मरावबाबा आत्राम असे समीकरण समजले जाते. मात्र राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या विभाजनानंतर धर्मराव आत्राम हे अजित पवारांच्या गटात गेले तर त्यांची कन्या भागयश्री आत्राम या शरद पवारांच्या पक्षात प्रवेश केला. अजित पवारांनी पूर्वी धर्मरावबाबा यांना उमेदवारी जाहीर केली होती. त्यानंतर आज गुरुवारी शरद पवार गटाकडून उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली असून यात त्यांच्या विरोधात लेकीला उमेदवारी देऊन अजित पवार गटाला मोठे आव्हान निर्माण केले आहे.

## ऐन निवडणुकीत मनोज जरांगे यांना जीवे मारण्याची धमकी

**जालना :** मराठा आंदोलन मनोज जरांगे यांनी विधानसभा निवडणुकीत उमेदवार उभे करण्याची घोषणा केली आहे. इच्छुकांशी चर्चा करुनच उमेदवार निश्चित करणार असल्याचे जरांगे यांनी आधीच सांगितले आहे. त्यामुळे त्यासाठी अनेक इच्छुक जरांगे यांची भेट घेण्यासाठी आंतरवाली सराटी येथे गर्दी करत आहेत. दरम्यान, मनोज जरांगेंना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. इच्छुक उमेदवार म्हणून येणार आणि गेम करणार, अशी धमकी एका युट्युब चॅनलच्या कमेंटमधून दिली आहे. एका अज्ञाताने ही धमकी दिली असू यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

युट्युबवरील एका चॅनलच्या कमेंटमध्ये बजाज बिश्नोई लीडर नावाच्या फेक अकाउंटवरुन ही धमकी देण्यात आली आहे. इच्छुक उमेदवार म्हणून येणार आणि गेम करणार, अशा आशयाची ही धमकी आहे. ऐन निवडणुकीत मनोज जरांगेंना धमकी मिळाल्याने एकच खळबळ उडाली आहे. या धमकीनंतर मनोज जरांगे यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली असून जरांगे बसत असलेल्या सरपंच मळा येथे पोलिस बंदोबस्त वाढवला आहे. तसेच जरांगेंना भेटण्यासाठी येणाऱ्या सर्वांची तपासणी होणार असल्याचे समजते.

सर्वांना सोबत घेऊन समीकरण जुळवणार

दरम्यान, एका जातीवर निवडणूक लढवता येणार नाही, सर्वांना सोबत घेऊन राजकीय समीकरण जुळवणार आहे. ३०-४० दिवस कष्ट घेतले तर पाच वर्ष सर्व जनता आनंदी राहील. सर्वांना हात जोडून विनंती करणार एकच जण उभे रहा. किती मतदारसंघ काढायचे हे आज जाहीर करायचे नाही. काही मतदारसंघांमध्ये उमेदवार उभे करणार असल्याचे सांगितल्यानंतर आता एकच उमेदवार दिल्यावाचून पर्याय नाही, असे मनोज जरांगे यांनी आज सकाळी माध्यमांशी संवाद साधताना म्हटले

२३ जिल्ह्यांमधील इच्छुकांना आंतरवालीत बोलावले

आंतरवालीत आज जरांगे पाटील इच्छुकांच्या मुलाखती घेणार आहेत. यासाठी मराठवाड्यासह २३ जिल्ह्यातील इच्छुकांना त्यांनी आंतरवालीत बोलावले आहे. इतक्या मोठ्या संख्येने येणाऱ्या उमेदवारांशी जरांगे पाटील स्वतंत्रपणे कसे बोलू शकतील, असा प्रश्न उपस्थित होतो आहे. मात्र, जरांगे यांनी २४ तास बैठक घेण्याची तयारी ठेवली आहे. गरज पडली तर पहाटे ४ वाजेपर्यंत बसू असे जरांगेंनी स्पष्ट केले.

कोण लढणार हे निश्चित केले जाईल

राजकीय पक्षांचे उमेदवार कोण आहेत, हे आम्ही बघत आहोत. लढायचे असेल तर एक उमेदवार द्यावा लागेल, हे समाजाने लक्षात ठेवले पाहिजे. उद्या कोणत्या मतदारसंघातून लढणार हे जाहीर करणार नाही, पण कोण लढणार हे निश्चित करू, असे जरांगे म्हणाले हाते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com
साहिल
कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स
• डी.टी.पी.जॉब वर्क
• मराठी, हिंदी, इंग्रजी
• एम.फील-पी.एच.डी., थेसिस
• स्पायरल / हार्ड बाईन्डींग
• लॅमिनेशन
• कलर प्रिंट
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

# महाराष्ट्र जनशक्ती


website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २५ ऑक्टोबर २०२४

## संजय राऊत यांनी श्रीगोंद्याचे तिकीट विकले

## शरद पवार गटाच्या नेत्याचा गंभीर आरोप





**अहमदनगर :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघाची महाविकास आघाडीची उमेदवारी विक्री केल्याचा गंभीर आरोप येथील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा माजी आमदार राहुल जगताप यांनी केला आहे. त्यांच्या या आरोपामुळे महाविकास आघाडीत एकच खळबळ माजली आहे.

श्रींगोदा विधानसभेतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाच्या नगर जिल्हाध्यक्षा अनुराधा नागवडे आणि राजेंद्र नागवडे यांनी बुधवारी उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. त्यानंतर लगेचच त्यांना पक्षाची उमेदवारी देण्यात आली. शरद पवार गटाचे माजी आमदार राहुल जगताप यांनी आता त्यांच्या उमेदवारीवरून संजय राऊत यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

संजय राऊतांची भूमिका लोकशाहीसाठी घातक

राहुल जगताप म्हणाले, संजय राऊत यांनी उपनेते साजन पाचपुते यांच्या मध्यस्थीने श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे तिकीट अनुराधा नागवडे यांना विकले. नागवडेंचा सेनेत प्रवेश होण्यापूर्वीच त्यांचा एबी फॉर्म तयार करण्यात आला होता. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना ही सामान्य कार्यकत्यांना न्याय देणारी होती. पण संजय राऊत यांनी 'द्या खोके आणि उमेदवारी एकदम ओके' असे सूत्र राबवले आहे. हे लोकशाहीला घातक आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार हे माझे राजकारणातील श्वास आहेत. अनेक अडचणी आल्या, पण आम्ही त्यांची साथ सोडली नाही. पवारांची श्रीगोंद्याच्या जागेबाबत काय अडचण होती हे मला माहीत नाही. माझा त्यांच्यावर कोणताही रोष नाही. पण विधानसभा निवडणुकीत काय करायचे याचा निर्णय आमचे कार्यकर्ते घेतील.

कोण आहेत अनुराधा नागवडे?

अनुराधा नागवडे या राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाच्या नगर जिल्हाध्यक्षा आहेत. त्या जिल्हा सहकारी बँकेच्या संचालिकाही आहेत. काँग्रेस पक्षाच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा म्हणूनही त्यांनी यापूर्वी काम केले होते. विधानसभा निवडणुकीत अजित पवार यांनी त्यांना उमेदवारीचे आश्वासन दिले होते. पण महायुतीच्या जागावाटपात हा मतदारसंघ भाजपच्या वाट्याला गेल्याने त्यांची अडचण झाली.

भाजपने येथूनच प्रतिभा पाचपुते यांना मैदानात उतरले आहे. त्यामुळे अनुराधा नागवडे यांनी महाविकास आघाडीकडून शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाकडून मैदानात उतरल्या आहेत. विशेष म्हणजे नागवडे यांनी गत आठवड्यातच शरद पवार, उद्धव ठाकरे व काँग्रेस प्रदेशाध्यक्षा नाना पटोले यांची भेट घेऊन महाविकास आघाडीची उमेदवारी मागितली होती.

## अरविंद केजरीवाल मविआचा प्रचार करणार



**मुंबई :** आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा प्रचार करणार असल्याची माहिती आहे. केजरीवाल महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार तसेच इतर घटक पक्षांचा प्रचार करणार आहेत. मात्र, ते काँग्रेसचा प्रचार करणार नसल्याचे सांगण्यात येत आहे. अरविंद केजरीवाल यांची राज्यात विभागवार सभा होणार असल्याची देखील माहिती आहे.

महाराष्ट्रात आम आदमी पक्षाचे संघटन काहीच भागात असून त्या मतदानाचा फायदा महायुतीला होऊ द्यायचा नाही, याची खबरदारी महाविकास आघाडीने घेतली आहे. शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्याकडून अरविंद केजरीवाल यांना प्रचाराचे निमंत्रण देण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे.

केजरीवाल भाजपविरोधात आक्रमक

कथित लिकर पॉलिसी भ्रष्टाचार प्रकरणार केजरीवाल यांना तुरुंगात जावे लागले होते. याच दरम्यान त्यांना दिल्लीचे मुख्यमंत्रीपदी गमवावे लागले. त्यामुळे केजरीवाल हे भाजपविरोधात अधिक आक्रमक झाले आहेत. त्यांच्या याच आक्रमकतेचा महाविकास आघाडीला फायदा करुन घेण्याचे मविआने ठरवले असल्याची माहिती आहे.

केजरीवालांच्या विभागवार होणार सभा

अरविंद केजरीवाल विधानसभा निवडणुकीत मुंबई, पुणे, नागपूर शहर यांसह विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये प्रचार करणार असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. दरम्यान, केजरीवाल हे महाराष्ट्रासह झारखंडमध्ये सुद्धा भाजपविरोधात प्रचार करणार आहेत.




## संभाजी ब्रिगेडची मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत चर्चा

**जालना :** शिवसेना ठाकरे गटाचा पाठिंबा काढल्यानंतर आता संभाजी ब्रिगेड राज्यातील ४० ते ५० जागा लढविणार असून त्यात मराठवाडा व विदर्भातील जागांवर विशेष लक्ष राहणार असल्याची माहिती संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे यांनी गुरुवारी ता. २४ दिव्य मराठीशी बोलतांना दिली आहे.

या संदर्भात आखरे यांनी सांगितले की, शिवसेना ठाकरे गटाने संभाजी ब्रिगेडचा विश्वासघात केल्यानंतर आम्ही आता अधिक सावध झालो आहोत. राजकारणात आम्ही सावध पवित्रा घेत विधानसभेच्या ४० ते ५० जागा लढविण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये प्रामुख्याने मराठवाड्याच्या जागांसह विदर्भातील जागांचा समावेश असून त्यानंतर इतर ठिकाणाच्या जागांचा समावेश आहे.

संभाजी ब्रिगेडकडून विधानसभा निवडणुक लढविण्यासाठी इच्छुकांकडून माहिती घेतली जात आहे. शुक्रवारी सकाळपर्यंत सर्व इच्छूकांची माहिती आमच्या हाती येणार आहे. त्यानंतर नेमक्या कोणत्या जागा लढवायच्या याचा निर्णय सर्व पदाधिकारी एकत्र बसून ठरविणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विशेषतः मराठवाडा व विदर्भाच्या जागांवर आमचे अधिक लक्ष असणार असून त्यासाठी स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांना नियोजनाबाबत सुचनाही देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. शुक्रवारी दुपारीच आमची यादी जाहिर करण्याचे प्रयत्न असल्याचेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चाही केली आहे. मराठा आरक्षणाबाबत संभाजी ब्रिगेडची मागील अनेकवर्षापासूनची भुमीका असल्याचे त्यांच्याशी बोलतांना सांगितले. सर्वांसोबत चर्चा करून योग्य तो निर्णय घेऊन असे जरांगे पाटील यांनी सांगितल्याचे आखरे यांनी स्पष्ट केले. पुढील काही दिवसांतच आणखी एकदा जरांगे पाटील यांची भेट घेणार असल्याचेही आखरे यांनी सांगितले.

## 'घड्याळ' न्यायप्रविष्ट आहे हा उल्लेख का नाही? : सुप्रीम कोर्टाने अजित पवारांच्या राष्ट्रवादीला खडसावले

**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आपल्या घड्याळ चिन्हावर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचा उल्लेख करत नसल्याची तक्रार आज शरद पवार गटाने सुप्रीम कोर्टात केली होती. त्यांच्या याचिकेवर सुनावणी करताना कोर्टाने राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांना खडेबोल सुनावत आपल्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्याची ताकीद दिली. प्रस्तुत कोर्टाने दिलेल्या सूचनांचे पालन करा, अन्यथा आम्ही स्वतःहून तुमच्यावर अवमाननेचा ठपका ठेवू, असे कोर्टाने म्हटले आहे.

सुप्रीम कोर्टाने काही दिवसांपूर्वी झालेल्या एका सुनावणीत राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला निवडणुकीच्या प्रचारात घड्याळ हे चिन्ह न्यायप्रविष्ट असल्याचा उल्लेख करण्याचे निर्देश दिले होते. पण अजित पवार गटाकडून यासंबंधी काही दुर्लक्ष झाल्याचे चित्र आहे. शरद पवार गटाने गुरुवारी ही बाब सुप्रीम कोर्टाच्या निदर्शनास आणून दिली. त्यांच्या तक्रारीवर सुनावणी करताना सुप्रीम कोर्टाने याचिकाकर्त्यासह अजित पवार गटाला कोर्टाच्या दिशानिर्देशांचे तंतोतंत पालन करण्याचे निर्देश दिले.

अभिषेक मनु सिंघवी यांनी केला युक्तिवाद

याविषयी शरद पवार गटाची बाजू मांडताना ज्येष्ठ विधिज्ञ अभिषेक मनु सिंघवी म्हणाले की, आम्ही घड्याळ हे चिन्ह दोन्ही गटांपैकी कुणालाही मिळू नये अशी मागणी केली होती. पण कोर्टाने १९ मार्च रोजी हे चिन्ह अजित पवार गटाला दिले. पण असे करताना तुम्ही काही अटी टाकल्या होत्या. त्या अटींचे अजित पवार गटाकडून पालन झाले नाही. कोर्टाने शरद पवार यांच्या नावाचा गैरवापर न करण्याचे आदेशही दिले होते. पण घड्याळ हे चिन्ह अजूनही शरद पवार या नावाशीच जोडले आहे.

घड्याळ हे चिन्ह कोर्टात न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे त्याचा फायदा दोघांपैकी कुणालाही होणार नाही याची काळजी घेण्याची गरज होती. कारण, हे चिन्ह पक्ष फुटीपूर्वीचे होते. कोर्टाने या चिन्हाखाली प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे नमूद करण्याची सूचना केली. पण त्याचे पालन होताना कुठेच दिसून येत नाही, असे सिंघवी म्हणाले. त्यानंतर सुप्रीम कोर्टाने याविषीय अजित पवारांची बाजू मांडणाऱ्या वकिलांना तुम्ही नियमांचे पालन का करत नाही? अशी विचारणा केली.

त्यावर अजित पवार गटाचे वकील बलवीर सिंग यांनी, आम्ही घड्याळ चिन्हाचा नियमानुसार वापर करत आहोत. सध्या शरद पवारांचा एकही फोटो पक्षाकडून दाखवला जात नाही, असे स्पष्ट केले.

सुप्रीम कोर्टाने दिली तंबी

त्यांच्या या स्पष्टोक्तीनंतर सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांना आपल्या दिशानिर्देशांचे पालन करण्याची तंबी दिली. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करायचे आहे, अन्यथा आम्ही तुमच्यावर अवमानाचा ठपका ठेवू, असे कोर्ट म्हणाले. कोर्टाच्या या तंबीनंतर अजित पवार गटाने सुप्रीम कोर्टाच्या दिशानिर्देशांचे आपल्याकडून पालन होत असल्याचे पुरावे प्रतिज्ञापत्र सादर करण्याची ग्वाही दिली. त्यानंतर कोर्टाने त्यांना तशी नोटीस बजावली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २५ ऑक्टोबर २०२४


## आझाद महाविद्यालयाचे स्वच्छता अभियान संपन्न






**औसा :-** आझाद महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग व नगर परिषद औसा यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता अभियान रॅली काढण्यात आली.

यामध्ये महाविद्यालयाच्या स्वंयसेवकाने स्वच्छतेचे महत्त्व विविध फलक व पथनाट्याद्वारे शहरवासीयांना दाखवून यामधून पर्यावरणाचे संवर्धन व त्याद्वारे आरोग्याविषयीची जनजागृती केली.या रॅली व स्वच्छता अभियानाचे मार्गदर्शक प्रा.डॉ. पांडूरंग आचोले यांच्या मार्गदर्शनांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रा. डॉ. दादासाहेब तोटे, प्रा. मजहर कोतवाल यांनी या रॅलीचे नेतृत्व करत ही स्वच्छता दिंडी यशस्वीरित्या पार पाडली.यामध्ये स्वयंसेवकाबरोबर प्राध्यापकांचीही उपस्थिती लक्षणीय होती.

## सध्या महाराष्ट्राला डाकू लोकांपासून वाचवणे महत्त्वाचे - नाना पटोले



**मुंबई :** काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी गुरुवारी पुन्हा एकदा महाविकास आघाडीच्या मुख्यमंत्रीपदाच्या संभाव्य उमेदवारावर चर्चा करणे तूर्त व्यर्थ असल्याचे स्पष्ट केले. मुख्यमंत्रीपदावर आताच चर्चा करणे व्यर्थ आहे. सध्या महाराष्ट्राला डाकू लोकांपासून वाचवणे सर्वात महत्त्वाचे आहे, असे ते महायुतीवर घणाघात करताना म्हणालेत.

महाराष्ट्रात २० नोव्हेंबर रोजी विधानसभेच्या २८८ जागांसाठी निवडणूक होणार आहे. या पार्श्वभूमीवर सत्ताधारी महायुती व विरोधी बाकावरील महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार कोण? अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. याविषयी गुरुवारी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना छेडले असता या मुद्यावर आताच चर्चा करण्याची काहीच गरज नसल्याचे स्पष्ट केले.

महाराष्ट्र वाचवण्यास आमचे प्राधान्य

नाना पटोले म्हणाले, महाविकास आघाडीचा विधानसभेच्या जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला आहे. उमेदवारही घोषित होत आहेत. त्यामुळे सध्या तरी महाविकास आघाडीचा मुख्यमंत्री कोण? यावर चर्चा करणे योग्य नाही. या मुद्यावर चर्चा करणे तूर्त व्यर्थ आहे. आम्ही सध्या राज्याला वाचवण्याचे काम करत आहोत. महाविकास आघाडीतील सर्वच घटकपक्ष एकमेकांसोबत मिळून काम करत आहेत. लोकांमधून आमदार निवडून आल्यानंतर मुख्यमंत्री ठरतो. त्यामुळे यासंबंधीची चर्चा थांबवण्याची गरज आहे.

मंत्री चंद्रकांत पाटील यांनी २४ नोव्हेंबर रोजी महायुतीचा मुख्यमंत्री शपथ घेईल असा दावा केला आहे. याविषयी नाना पटोले यांना छेडले असता, त्यांनी त्यांचा चांगलाच समाचार घेतला. ते म्हणाले, महायुतीमध्ये काय सुरू आहे हे चंद्रकांत पाटलांनाच माहिती आहे. त्यांच्या महायुतीचा दरबार दिल्लीला गेला आहे. या आघाडीमध्ये शेवटपर्यंत चर्चा करून वाटाघाटीतून प्रश्न सुटतील.

हे लोक जनतेच्या मतावर डाका टाकणारे

चंद्रकांत पाटलांनी मुख्यमंत्री पदाचे नाव सांगितले का? हे डाकू लोक आहेत. भाजप आता म्हणत आहे आमचे सरकार येणार. मुख्यमंत्री महायुतीचा होणार. त्यावरून त्यांची भूमिका दिसून येत आहे. अजून काहीच ठरले नाही. मतदानही झाले नाही. हे लोक जनतेच्या मतावर डाका टाकणारे आहेत, असे पटोले म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे राज्यात विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजल्यानंतर राजकीय वर्तुळातील घडामोडींना वेग आला आहे. गत काही दिवसांपासून महायुती व महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या जागावाटपाच्या चर्चा सुरू आहेत. या आघाड्यांनी आपले बहुतांश उमेदवार मैदानात उतरवलेत. पण काही वादाच्या जागांवर अद्यापही खल सुरू आहे. सद्यस्थितीत या दोन्ही आघाड्यांना प्रचंड बंडखोरीचा सामना करावा लागत आहे.

## हिंगोली विधानसभेच्या निवडणुक विभागाचे ताळतंत्र बिघडले

**हिंगोली :** विधानसभा निवडणुक विभागाचे ताळतंत्र बिघडल्याचे चित्र गुरुवारी ता. २४ पहावयास मिळाले आहे. आज दोन उमेदवारांनी तीन अर्ज भरल्यानंतर अधिकारी व कर्मचारी कागदपत्रे चाळतांना चांगलेच घामाघूम झाले. तर अर्जाची प्रसिध्दी करण्यासाठी कर्मचाऱ्यांना तब्बल तीन तासाचा वेळ लागल्याने गतीमान प्रशासनाचा बुरखा फाटल्या गेला आहे.

हिंगोली जिल्हयात तीन विधानसभा मतदार संघात निवडणुक होऊ घातली आहे. हिंगोलीसह कळमनुरी व वसमत विधानसभेची निवडणुक होत असून निवडणुक प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून तीनही ठिकाणी निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या आहेत. या अधिकाऱ्यांच्या हाताखाली अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मोठा लवाजमा नियुक्त करण्यात आला आहे.

दरम्यान, हिंगोली विधानसभेच्या निवडणुक विभागाचे कामकाज मात्र अतिशय संथगतीने सुरु असल्याचे चित्र आहे. हिंगोली विधानसभेमध्ये गुरुवारी ता. २४ सकाळी आकरा ते दुपारी तीन यावेळेत दोन उमेदवारांनी तीन उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. यामध्ये विद्यमान आमदार तान्हाजी मुटकुळे यांनी दोन तर माजी आमदार भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी एक उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

आजच्या दिवसात एकूण तीन उमेदवारी अर्ज प्राप्त झाल्यानंतर कर्मचाऱ्यांची मात्र चांगलीच घामाघूम पहावसाय मिळाली. या अर्जाची प्रसिध्दी नेमकी कुठे करावी यासाठी चांगलाच खल झाला. त्यातही हिंगोली विधानसभा मतदार संघात सेनगाव तालुका येत असल्याने तेथील तहसील कार्यालयाच्या सुचना फलकावरही अर्जाची प्रसिध्दी करावी तर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या फलकावरही प्रसिध्दी द्यावी यावर कर्मचाऱ्यांमधूनच चांगलीच चर्चा झाली. त्यानंतर संबंधित विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तीन तासाच्या कालावधीनंतर सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास तीन अर्जाची प्रसिध्दी केली. यावरून गतीमान प्रशासनाचा अजब नमुना दिसून आला.

या संदर्भात उपविभागीय अधिकारी तथा निवडणुक निर्णय अधिकारी समाधान घुटुकडे यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधला असता काही वेळातच आपण कार्यालयात येत असल्याचे सांगत लवकरच अर्जाची प्रसिध्दी दिली जाईल असे सांगितले.

## विलास भुमरेंना बालेकिल्ल्यात राहणार ठाकरे गटाचे आव्हान

**छत्रपती संभाजीनगर :** पैठण मतदारसंघावर मागील तीसवर्षांपासून संदिपान भुमरे यांचेवर्चस्व राहिले आहे. आतासंदिपान भुमरे खासदार झाल्यानेत्यांचे सुपुत्र विलास भुमरे यांनाशिंदेसेनेकडून अपेक्षेप्रमाणेनुकतीच उमेदवारी जाहीर झालीआहे. मात्र, त्यांना उमेदवारी जाहीरझाली असली तरी स्थानिक भाजपपदाधिकाऱ्यांमध्ये भुमरेंचे कामकरायचे की नाही याची धुसफूससुरू आहे.

तर, विलास भुमरेंनी कार्यकर्तामेळावा घेऊन भाजपला सोबतघेऊन काम करणार असल्याचेजाहीर केले आहे. आता विलासभुमरेंविरोधात उबाठाकडून कोणउमेदवार देणार तसेच जरांगे फॅक्टरकाय असणार, यावर विलासभुमरेंच्या विजयाचे गणितअवलंबून राहणार आहे. भुमरेविरोधी पक्षातील प्रस्थापितनेत्यांची शेवटची लढाई मागीलतीस वर्षांपासून संदिपान भुमरे यांचेतालुक्यातील राजकारणावरवर्चस्व आहे. एक टर्म वगळताभुमरे सलग पाचव्यांदा आमदारम्हणून निवडून आले आहेत.

त्यांचे पुत्र विलास भुमरेपहिल्यांदाच विधानसभा लढतअसून त्यांचा विजय झाला तर इतरपक्षांतील प्रस्थापित राजकीयनेत्यांची शेवटची निवडणूकठरणार, अशी चर्चा राजकीयविश्लेषकांनी व्यक्त केली आहे.यात ठाकरे गटाला ही जागासुटल्याने राष्ट्रवादी शरद पवारगटाचे माजी आमदार संजयवाघचौरे काय भूमिका घेणार वकाँग्रेससह इतर पक्षांचे नेते एकत्रयेणार का, त्यावर ठाकरे गटाच्याउमेदवाराच्या विजयाचे गणितठरणार असल्याचे चिन्हमतदारसंघात दिसत आहे.